# इंटरनॅशनल सोसायटी फॉर एक्सलन्स इन प्रोजेक्ट्स मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च – अध्यक्ष- डॉ.आर.के.जाधव यांच्या जागा मागणी संदर्भातील प्रकरणाची सविस्तर माहिती.

## मौजे निळजे, ता.कल्याण, जि.ठाणे येथील जागा मागणी प्रकरण

१. श्री.जाधव यांनी मौजे निळजे, ता.कल्याण, जि.ठाणे येथील सर्व्हे नं. 63 (पैकी) 10 हे. 78 आर ही जमीन **शैक्षणिक प्रयोजनार्थ** मागणी केली होती. या जागेची सरकारी किंमत रु.5.53 कोटी एवढी होती.

२. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशान्वये दिनांक 12/07/2011 रोजीचा गायरान जमिनी संदर्भातील शासन निर्णयानुसार खाजगी संस्था यांना गायरान जमीन मंजूर करता येणार नाही, असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला होता.

३. संस्थेचे अध्यक्ष यांनी मंत्रालयातील लोकशाही दिनी दिनांक 03/09/2012 रोजी अर्ज करुन त्यांचे प्रलंबित प्रकरणाबाबत दाद मागितली होती.

४. महसूल व वन विभागाने दिनांक 12/9/2012 रोजीच्या पत्रान्वये त्यांना मौजे निळजे, ता.कल्याण येथील जमीन गुरचरण असल्यामुळे व मा.सर्वोच्च न्यायालय यांच्या आदेशानुसार धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला असल्याने संबंधीत जमीन मंजूर करता येणार नाही असे कळविले होते. (परिशिष्ट-1)

## मौजे नांदिवली तर्फे अंबरनाथ, जि.ठाणे

५. संस्थेने **सामाजिक प्रकल्पाकरीता** मौजे नांदीवली तर्फे अंबरनाथ, ता.कल्याण, जि.ठाणे येथील सर्व्हे नं. 8 व 9 (भाग) क्षेत्र 12 हे 95 आर या जमिनीची देखील मागणी केली होती.

६. दिनांक 21 जून, 2012 रोजी मंत्रालयात लागलेल्या आगीत संस्थेचे जागा मागण्या संदर्भातील प्रकरण जळून नष्ट झालेले असल्याने मौजे नांदिवली तर्फे अंबरनाथ, ता.कल्याण, जि.ठाणे येथील जागा मागणी संदर्भातील प्रकरण पुनर्बांधणी करुन दिनांक 01/09/2012 रोजी प्राप्त करुन घेण्यात आले आहे.

७. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी सादर केलेल्या प्रस्तावात जमीन पिक पहाणीला गुरचरण अशी नोंद असल्याने फेरफार क्र. 68 दिनांक 01/12/1950 अन्वये जिल्हाधिकारी, ठाणे यांचे आदेश क्र. एलएक्यु 397 दिनांक 29/12/1949 व Land Acquisition Officer, कल्याण यांचे आदेश क्र. एलएक्यु-5057 दिनांक 30/3/1950 अन्वये भूसंपादनान्वये प्रांतीक सरकारचे नावे दाखल झालेले आहे. (परिशिष्ट-2)

८. संस्थेने मागणी केलेल्या जमिनीचे सन 2011 च्या शिघ्रसिध्द गणकानुसार येणारे मुल्यांकन रु.77,40,000/- (रुपये सत्ताहत्तर लाख चाळीस हजार) एवढे होते. (परिशिष्ट-2)

९. ग्रामपंचायत, नांदिवली यांनी संस्थेचे अध्यक्ष डॉ.जाधव यांना दिनांक 26/12/2011 रोजीच्या पत्रान्वये ना हरकत दाखला मिळणेकामीची विनंती फेटाळण्यात आलेली आहे, असे कळविलेले होते.

१०. याबाबत विशेष ग्रामसभेने सदरची जमीन ग्रामपंचायतीच्या विकास कामा साठी आवश्यक असल्याने संस्थेची विनंती फेटाळली होती. (परिशिष्ट-3)

११. दिनांक 28/12/2012 रोजी मी विरोधी पक्ष नेता म्हणुन संस्थेच्या विनंतीनुसार शासनामार्फत निर्णय घेण्यास दिरंगाई होत असल्याने तत्कालीन मा.मंत्री (महसूल) व अपर मुख्य सचिव (महसूल) यांना पत्र दिले होते. **म्हणजेच संस्थेच्या प्रकरणाबाबत माझी भूमिका गुणवत्तेवर निर्णय घेणे संदर्भातील होती हे स्पष्ट होते**. (परिशिष्ट-4)

१२. संस्थेचे अध्यक्ष यांनी दिनांक 1/2/2013 रोजीच्या पत्रान्वये तत्कालीन अपर मुख्य सचिव (महसूल) यांना जमीनीच्या किंमतीपोटी रुक्कम 77 लाख 40 हजार या रकमेचा दिनांक 01/12/2013 रोजीचा 624963 या क्रमांकाचा बँक ऑफ इंडियाचा धनादेश आगाऊ भोगाधिकार मुल्य म्हणून पाठविला होता. (परिशिष्ट-5)

१३. शासनाने त्यांचेकडील दिनांक 20/2/2013 रोजीच्या पत्रान्वये अर्जदार संस्थेच्या अध्यक्षांना आगाऊ किंमत वसूल करण्याबाबत शासनाचे धोरण नसल्याने व अंतिम मंजूरी झालेली नसल्याने उपरोक्त धनादेश परत करण्यात आहे असे लेखी कळविलेले होते. (परिशिष्ट-6)

१४. महसूल विभागाने सदर नस्ती नगरविकास विभाग यांच्या अभिप्रायासाठी सादर केली होती त्याअनुषंगाने नगरविकास विभाग यांनी संचालक, नगररचना व नियोजन प्राधिकरण एमएमआरडीए यांचे अभिप्राय मागितले होते.

१५. संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य यांचेकडील दिनांक 05/03/2013 रोजीच्या पत्रान्वये आरक्षणाबद्दल वस्तुस्थिती स्पष्ट केलेली आहे.

१६. विकास योजना मंजूरीनंतरच मौजे नांदिवली येथील मागणी केलेल्या जमीनीसंदर्भात रहिवास विभागाचे शिल्लक राहणारे निर्गती साठी विचारात घ्यावयाचे क्षेत्र निश्चित होऊ शकेल, असे स्पष्ट करुन गायरान जमिनीबद्दल दिनांक 12/7/2011 रोजीचा शासन निर्णय विचारात घेण्याबाबत सूचित केले आहे व तद्नंतरच जागा निर्गतीबाबत पुढील निर्णय घ्यावा असेही सूचित केले आहे. (परिशिष्ट-7)

१७. एमएमआरडीए यांनी त्यांचे दिनांक 7/3/2013 रोजीच्या पत्रान्वये 27 गावाचा सुधारीत विकास योजना अद्याप शासनाने मान्य केलेला नसल्याचे स्पष्ट केलेले आहे. (परिशिष्ट-8)

१८. संस्थेचे अध्यक्ष डॉ.जाधव यांनी दिनांक 14/5/2013 रोजीच्या पत्रान्वये संचालक, नगररचना यांनी जागा मागणी प्रकरणात शासनास सादर केलेल्या अभिप्रायाच्या अनुषंगाने त्यांचेवर भ्रष्टाचाराचे आरोप केलेले आहेत. (परिशिष्ट-9)

१९. अशाच प्रकारे मंत्रालयाच्या नगरविकास विभागावर सुध्दा भ्रष्टाचाराचे आरोप केलेले आहे. तसेच तत्कालीन मुख्य सचिव तसेच महानगर आयुक्त, एमएमआरडीए यांना दिनांक 04/03/2013 रोजी पत्र पाठवुन या आरोपांची पुर्नरावृत्ती केली आहे. (परिशिष्ट-9)

२०. संस्थेचे अध्यक्ष डॉ.जाधव यांनी दिनांक 12/6/2013 रोजी अपर मुख्य सचिव (महसूल) यांना लिहिलेल्या पत्रात संस्थेस जमीन मंजूर न करणे म्हणजेच अन्याय अत्याचार करणे असे नमूद केले आहे. (परिशिष्ट-10)

२१. संस्थेचे अध्यक्ष डॉ.जाधव यांनी दिनांक 18/02/2013 रोजीच्या पत्रान्वये चेअरमन, नॅशनल कमिशन फॉर शेड्युल्ड कास्ट, नवी दिल्ली यांचेकडे दाखल केलेल्या निवदेनामध्ये नांदिवली येथील मागणी केलेल्या जमिनी संदर्भात शासनाविरुध्द तक्रार करत जातीयवाद, वंशवाद व भ्रष्टाचाराचे आरोप केलेले आहेत. (परिशिष्ट-11)

२२. शासनाने दिनांक 23/7/2013 रोजीच्या पत्रान्वये नॅशनल कमिशन फॉर शेड्युल्ड कास्ट यांचेकडे अहवाल सादर केलेला होता. याबाबत कमिशनने शासनाला तत्पश्चात पून्हा पत्र व्यवहार केलेला नाही, म्हणजेच शासनाची भूमिका मान्य केलेली आहे. (परिशिष्ट-12)

२३. संस्थेचे अध्यक्ष डॉ.जाधव यांनी दिनांक 24/5/2013 व दिनांक 27/5/2013 रोजीच्या तत्कालीन अपर मुख्य सचिव (महसूल) यांना लिहिलेल्या पत्रात नगरविकास विभागावर पुन्हा भ्रष्टाचाराचे आरोप करुन जाणीवपूर्वक दिशाभूल करण्यात आलेली आहे, असे नमुद केले आहे.

२४. संस्थेचे अध्यक्ष यांनी दिनांक 17/5/2013 रोजी माहिती अधिकार अधिनियम अंतर्गत अपील दाखल करुन तत्कालीन महसूल सचिव श्री.स्वाधीन क्षत्रिय व तत्कालीन नगरविकास सचिव श्री.मनुकुमार श्रीवास्तव हे त्यांच्या जागा मागणी मंजूरीच्या प्रकरणात जातीय वादी अधिकारी असल्याने निर्णय घेण्यास दिरंगाई करुन बळी घेत असल्याचे नमुद केले आहे. (परिशिष्ट-13)

२५. शासनाने अर्जदारास दिनांक 22/06/2013 रोजीच्या पत्रानुसार नगरविकास विकास विभागाच्या अभिप्रायाच्या अनुषंगाने **"प्रारुप विकास योजना मंजूर होईपर्यंत सदर प्रकरणी जमीन मंजूर करता येणार नाही"** असे कळविले होते. यावरुन संस्थेची विनंती दिनांक 28/06/2013 रोजी फेटाळण्यात आली होती. (परिशिष्ट-14)

२६. दरम्यानच्या काळात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील जनहित याचिका क्र. 28/2013 मधील निर्णयानुसार मौजे नांदिवली येथील उपरोक्त जागा शासनाच्या परिवहन विभागास अद्यावत प्रशिक्षण केंद्र तयार करण्यासाठी मंजूर करण्यात आली व जागेचा आगाऊ ताबा देखील देण्यात आलेला आहे.

२७. परिवहन विभागास नांदिवली येथील जागा मंजूर करण्यात आल्यानंतर सुध्दा संस्थेने पुन्हा जागा मंजूरीबाबत विनंती केली होती. मात्र, मा.उच्च न्यायालयाच्या जनहित याचिकेच्या झालेल्या निर्णयान्वये परिवहन विभागास जागेचा आगाऊ ताबा देण्यात आल्याने संस्थेची विनंती दिनांक 27/03/2014 रोजीच्या पत्रान्वये पुन्हा एकदा फेटाळण्यात आली होती. (परिशिष्ट-15)

२८. ऑक्टोबर, 2014 मधील महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात सत्तांतर होऊन मी मंत्री (महसूल) पदाचा कार्यभार स्विकारला.

२९. डॉ.जाधव यांनी संस्थेच्या वतीने दिनांक 24/11/2014 रोजी माझेकडे अर्ज करुन वरील जागा मागणीची विनंती फेटाळण्यात आल्याबाबतचा दिनांक 27/03/2014 रोजीच्या निर्णयाचा फेरविचार होणेबाबत विनंती केली होती. (परिशिष्ट-16)

३०. संस्थेने माझेकडे सादर केलेल्या अर्जातील विषयच बोलका आहे-

"Request to use "Eminent Domain" for Allotment of Land for Education Purpose at village Nilaje and Nandivali Taluka Kalyan of District Thane to nullify "Mala Fide" action by previous government, IAS officers in collusion with then politician by using veto power authority of Revenue Minister under section 257 of Maharashtra Land Revenue code, 1966"

३१. संस्थेचे अध्यक्ष यांनी त्यांचे दिनांक 24/11/2013 रोजीच्या अर्जामध्ये खालीलप्रमाणे वेगवेगळे कार्यालय व अधिकाऱ्यांविरुध्द तक्रार व भ्रष्टाचाराचे आरोप नमूद केलेले होते. (परिशिष्ट-16)

- ग्रामपंचायत, निळजे व ग्रामसेवक यांनी ना हरकत दाखला देणेकामी 6 कोटी रुपयांची लाच मागितल्यामुळे त्यांचेविरुध्द एसीबी कडून गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
- ग्रामसेवक, निळजे अनधिकृत चाळ वाल्यांकडून 3 लाख रुपये प्रती महिना कमावत असल्याची तक्रार नमुद केली आहे. नांदिवली ग्रामपंचायतीची केस याच प्रकारची असून त्यांना मंत्रालयातील अधिकारी, राजकीय नेते यांचा पाठींबा असल्याचे नमुद केले आहे.
- मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी तत्कालीन परिवहन सचिव डॉ.शैलेश कुमार शर्मा, तत्कालीन प्रधान सचिव (महसूल) श्री.प्रविण परदेशी, तत्कालीन प्रधान सचिव (नगरविकास) श्री.मनुकुमार श्रीवास्तव, तत्कालीन परिवहन आयुक्त श्री.सहस्त्रबुध्दे आणि तत्कालीन एमएमआरडीएचे श्री.संपतकुमार यांनी बैठकीमध्ये ही जमीन परिवहन विभागाला देण्याबाबत घेतलेला निर्णय अर्जदारांवर अन्यायकारक असून यामध्ये भ्रष्टाचार झालेला आहे असा अर्जदाराचा आरोप आहे.

- सदरची बैठक तत्कालीन मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली झाली असेही त्यांनी नमूद केले आहे व एमएमआरडीएचे श्री.संपतकुमार यांचेविरुध्द कारवाई करण्यास मुख्य सचिव अपयशी असे देखील त्यांनी नमूद केले आहे.
- परिवहन विभागास जागा मंजूरी संदर्भात जनहित याचिका क्र. 28/2013 मध्ये मा.उच्च न्यायालयातील जनहित याचिकेसंदर्भात सुध्दा मा.उच्च न्यायलयाचे संबंधीत न्यायाधीश तसेच या याचिकेतील अर्जदार आणि विशेष वकील (न्यायालयाचे मित्र) श्री.वारुंजकर यांचेविरुध्द सुध्दा आरोप केलेले आहेत.
- तसेच मंत्रालयातील संबंधीत उप सचिव श्री.घरत यांचेविरुध्द सुध्दा पैसे मागितल्याबाबत अर्जदारांने तक्रार दाखल केलेली असून मुख्य सचिव यांनी श्री.घरत यांचेविरुध्द कारवाई करण्याऐवजी त्यांना संरक्षण दिल्याची तक्रार आहे.

३२. संस्थेच्या अध्यक्षांचे निवेदन व अर्ज यासर्व बाबी तपासणे आवश्यक वाटल्याने संस्थेचा अर्ज मी स्वतः पुनर्विलोकन अर्ज म्हणून सुनावणीस घेण्याचे निश्चित केले. प्रकरणाची सुनावणी घेण्यात आली.

३३. संस्थेस संधी देऊन बाजू ऐकून घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस संस्थेचे अध्यक्ष डॉ.जाधव यांना प्रकरणाची वस्तुस्थिती समजावून सांगण्यात आली.

३४. सार्वजनिक प्रयोजनास्तव परिवहन विभागास जागा मंजूरीबाबत खाजगी संस्थेच्या तुलनेने प्राधान्य असल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले. जागा मंजूरी ही मा.उच्च न्यायालयातील जनहित याचिकेच्या निर्णयानुसार देण्यात आली आहे हे स्पष्ट करण्यात आले होते.

३५. संस्थेचा पुनर्विलोकन अर्ज मी दिनांक 25/02/2016 रोजीच्या निर्णयान्वये फेटाळला व परिवहन विभागास जागा मंजूरीचा आदेश सार्वजनिक प्रयोजनास्तव असल्याने कायम करण्यात आला. (परिशिष्ट-17)

३६. महसूल व वन विभागाकडून उपरोक्त दिनांक 25/02/2016 रोजीचा माझ्या निर्णयाची प्रत दिनांक 10/3/2016 रोजीच्या पत्रान्वये विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी व अर्जदार संस्थेस कळविण्यात आला आहे. (परिशिष्ट-17)

३७. शासनाचा दिनांक 28/06/2013 व दिनांक 27/03/2014 रोजीच्या प्रशासकीय आदेश आणि दिनांक 25/02/2016 रोजीचा पुनर्विलोकन अर्जावरील निर्णय अर्जदार संस्थेस मान्य नसल्यास त्यांनी मा.उच्च न्यायालयात आव्हानीत करणे योग्य ठरले असते.

३८. अर्जदार यांचे प्रकरण यापूर्वी सन 2012, 2013, 2014 मध्ये गुणवत्ता व कायदेशीर / नियमात बसत नसल्यामुळे फेटाळण्यात आलेले होते. ही बाब वेळोवेळी अर्जदारांना कळविण्यात येऊनही त्यांनी वारंवार पाठपुरावा करणे तसेच जागा मंजूर होण्याच्या अगोदरच संबंधीत जागेच्या किंमतीचा चेक शासनास पाठविणे संदर्भातील त्यांची भूमिका योग्य वाटत नाही.

३९. याबाबत एकंदरीत जाणिवपूर्वक शासनाला व क्षेत्रीय कार्यालयांना त्रास देणे हेच केवळ एकमेव उद्दीष्ट अर्जदाराचे असल्याचे दिसून येते.

४०. अर्जदार हे उच्च विद्याविभूषित असूनही त्यांना प्रकरणातील कायदेशीर मुद्यांचा व शासकीय कामकाजाबाबत माहिती नसावी ही बाब प्रथमदर्शनी खेदजनक वाटते.

**-**